कोकणसाद
www.kokansad.com

रविवार, दि. २७ नोव्हेंबर २०२२

# संविधानाचे पालन करणे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य!

## न्यायाधीश वाय. पी. बावकर यांचे प्रतिपादन

### हळबे महाविद्यालयात 'संविधान दिन' कार्यक्रम संपन्न

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग :** आपणास मिळालेल्या संविधानाचे पालन करणे हेच प्रत्येक भारतीयांचे मूलभूत कर्तव्य आहे, असे प्रतिपादन दोडामार्गचे न्यायाधीश वाय. पी. बावकर यांनी केले. दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयात संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

आपल्या भाषणात न्या.बावकर पुढे म्हणाले की राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर, भारतीय स्मृती लढ्यातील आदर्शांची जोपासना, भारतीय सार्वभौमत्वाचे संरक्षण, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, वर्गीय भेद न करणे, बंधूभाव जोपासणे, स्त्रियांचा आदर करणे, संमिश्र संस्कृतीचे व नैसर्गिक साधनसंपदेचे रक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करून राष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यासाठी ६ ते १४ वर्षे वयातील प्रत्येक बालकास समान व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, ही सर्व आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख विवेकानंद नाईक यांनी आपले विचार मांडले. तर ॲड. सोनू गवस यांनी भारतीय घटनेचे महत्व सांगून तिची उपयुक्तता विषद करतांना या लवचिक घटनेत कितीही बदल करता येत असले तरी मूळ चौकट मात्र बदलताच येणार नाही, असे सांगितले.



हळबे महाविद्यालयात आयोजित संविधान दिन कार्यक्रमात बोलताना न्यायाधीश वाय. पी. बावकर

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत म्हणाले, संविधान हा आपला सर्वांचाच पवित्र ग्रंथ आहे. अतिशय कष्ट आणि परिश्रमातून तयार झालेला हा ग्रंथ सर्वांनी वाचावा. त्यानुसार आपले वर्तन करावे. आपली जडणघडन त्यानुसार असावी.

सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय खडपकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले.